# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक- २९ सप्टेंबर २०१५

## मुंबई विद्यापीठ दुष्काळग्रस्तांच्या मदतीला

## दुष्काळग्रस्त मराठवाड्याला मुंबई विद्यापीठाचा मदतीचा हात

मुंबई – ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणारे आणि देशाची ज्ञानविषयक गौरवशाली परंपरा आणि वाढता सामाजिक-आर्थिक प्रभाव पाहता मुंबई विद्यापीठाने सामाजिक बांधिलकीच्या नात्यातून मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त शेतक-यांना मदतीचा हात दिला आहे. मुंबई विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाने पुढाकार घेऊन एनजीओच्या मदतीने दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी कुटुंबाना धान्य दान स्वरुपात पुरविणार आहेत. राज्यशास्त्र विभागाच्या सोबतच आता मानसशास्त्र विभागानेही मदतीचा हात पुढे केला आहे. या उपक्रमामध्ये  नागरीकांना १ किलो तांदूळ आणि एक किलो डाळ किंवा धान्यस्वरुप वस्तू दान करता येणार आहेत . जवळपास १ हजार किलो धान्य गोळा करुन दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी कुटुंबाना पुरविले जाणार आहे.याकामी रजनी फाऊंडेशनची मदत घेतली जाणार आहे. मुंबई विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागामध्ये ४ ऑक्टोबर २०१५ पर्यंत नागरिकांना स्वेच्छेने धान्य जमा करता येणार आहे.त्यानंतर ५ ऑक्टोबरला राज्यशास्त्र विभागातील १२ जणांची एक तुकडी आणि दोन प्राध्यापक मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागास भेट देणार आहेत.८ ऑक्टोबरपर्यंत मराठवाड्यातील विविध दुष्काळग्रस्त भागातील शेतक-यांना प्रत्यक्ष मदत करणार आहेत.या स्तूत्य उपक्रमास विविध स्तरातून मदतीचा हात पुढे येत आहे.यामध्ये अनेक स्वयंसेवक पुढाकार घेत आहेत.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)